# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**तरेळा-कसार्डे (पारकर वाडी) गडमट मार्ग व्हाया फोंडा (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(१) १४४५९ (१०-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तरेळा-कसार्डे (पारकर वाडी) गडमट मार्ग व्हाया फोंडा (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे परिसरातील नागरिकांचे हाल होत असून नागरिक तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी रस्ते दुरुस्तीची वारंवार मागणी करुनही दुरुस्ती करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) प्रश्नाधिन रस्त्याचे नाव ओझरम कासार्डे ब्राम्हणवाडी (आचीर्णे) गडमठ मार्ग असे असून रस्ते विकास आराखडा सन २०११-२०२१ नुसार हा रस्ता इ.जि.मा. क्र. १२ असा नमूद आहे. सदर रस्ता कणकवली व वैभववाडी या दोन तालुक्यातून जातो.

कासार्डे गावातील सिलिका खाणींमधुन काढलेली सिलीका, ट्रक व डंपर मधून ओव्हर लोड वाहतूक या रस्त्याच्या २.७० कि.मी. लांबीमधून होते. या २.७० कि.मी. लांबीपैकी कि.मी. ५/९०० ते ६/०० या साखळीमध्ये मोठा पुल व जोड रस्ता १००.०० मीटरचे डांबरीकरण व मजबुतीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून व १.२० कि.मी. लांबीमध्ये प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेतून डांबरीकरण मजबुतीकरण व नुतनीकरण सन २०१४-१५ मध्ये करण्यात आले आहे.

सदर रस्त्याच्या नादुरुस्त लांबीमधील दुरुस्तीचे काम रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमाअंतर्गत सन २०१५-१६ च्या आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध होणाऱ्या निधी व निकषाच्या अधिनतेने हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाजारवाडी पाले (ता.भोर, जि.पुणे) या इतर जिल्हा मार्ग रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(२) ४२३७३ (२९-०४-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाजारवाडी पाले (ता.भोर, जि.पुणे) या इतर जिल्हा मार्ग रस्त्याची गेल्या दोन वर्षापासून दुरवस्था झाली असल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०१-२०१८) :** (१) अशंत: खरे आहे.
(२) प्रश्नांकित रा.मा.११९ ते हातनोशी बाजारवाडी पळसोशी पाले रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.९७ असून या रस्त्याची एकूण लांबी १२.०० कि.मी. आहे. त्यापैकी १/०० ते ८/१०० कि.मी. लांबीतील रस्ता दर्जोन्नती करण्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमधून प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हा परिषदेतील आरोग्य सेवक आणि औषध निर्माण अधिकारी पदाच्या परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेत झालेला गैरकारभार**

**(३) ६१८३३ (१०-०८-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा परिषदेतील आरोग्य सेवक आणि औषध निर्माण अधिकारी पदाच्या दिनांक २५ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास परिक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याने राधानगर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी यांना न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्याची माहिती दिनांक १९ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) उपविभागीय पोलिस अधिकारी, शहर विभाग सांगली यांच्या तपासानुसार श्री.अभिजीत आनंदा पाटील, विस्तार अधिकारी (कृषी) पंचायत समिती राधानगरी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांचा गुन्हयात सहभाग असल्याचे आढळून आल्याने त्यांना दि.१७/०४/२०१६ ते दि.२१/०४/२०१६ पर्यंत ५ दिवस पोलिस कोठडी देण्यात आली होती. त्यामुळे त्यांना दि.१७/०४/२०१६ पासून जिल्हा परिषद सेवेतून निलंबित केले आहे. तसेच श्री.अभिजीत आनंदा पाटील यांचे विरुध्द सहाय्यक आयुक्त (चौकशी) पुणे विभाग पुणे यांचेकडे विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे. श्री.अभिजीत पाटील यांना निलंबित करुन १ वर्षाचा कालावधी झाला असल्याने त्यांना सेवेत पुन:स्थापित करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी विभागीय आयुक्त पुणे यांचेकडे दि.१९/०४/२०१७ च्या पत्रान्वये सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिवरा आश्रम ग्रामपंचायतचे (जि.बुलढाणा) सरपंच आणि सचिव यांनी केलेला गैरकारभार**

**(४) ६६५८२ (२७-०१-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवरा आश्रम ग्रामपंचायतचे (जि.बुलढाणा) सरपंच आणि सचिव हे सदस्यांची दिशाभूल करणे, त्यांना सभेमध्ये खोटी माहिती देऊन वरिष्ठांकडे वेगळीच माहिती सादर करणे, मासिक सभेमध्ये चुकीचे ठराव घेऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र वेगळीच करणे अशा प्रकारचे आरोप करीत याबाबतची तक्रार सात सदस्यांनी मेहकर गटविकास अधिकारी यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरपंच व सचिव यांनी माहे सप्टेंबर, २०१५ पासून ते आजपर्यंत ग्रामपंचायत मार्फत केलेल्या कोणत्याही कामाचे व केलेल्या खर्चाचे कोणतेही हिशेब दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०१-२०१८) :** (१) होय, ग्रामपंचायत विवेकानंद नगर (हिवराआश्रम) येथील सात सदस्यांनी ग्रामपंचायतीच्या सरपंच, सचिव, ग्रामपंचायत, विवेकानंदनगर यांना उद्देशून लिहिलेल्या दि. निरंक तक्रारीची प्रत गट विकास अधिकारी पंचायत समिती, मेहकर यांच्याकडे दि. ०६ ऑक्टोबर, २०१६ रोजी प्राप्त झाली आहे.

(२) नाही, हे खरे नाही माहे, सप्टेंबर २०१५ पासून ग्रामपंचायतीच्या सर्व मासिक सभांमध्ये पंचायतीचा महिन्यातील जमा-खर्चाचा हिशोब नमूद करून तसे ठराव मंजूर करण्यात आले आहेत. संबंधित सात सदस्यांनी ग्रामपंचायतीकडे केलेल्या तक्रारीमधील मागणीनुसार

ग्रामपंचायतीच्या दि. २९/१०/२०१६ रोजीच्या सभेतील पारित ठराव क्र.५ अन्वये दि. ०९/९/२०१५ ते ३०/०९/२०१६ या कालावधीतील जमाखर्च सभेसमोर मांडण्यात आला असून त्यावर चर्चा करून जमाखर्च मंजूर केलेला आहे

(३) होय, सदर प्रकरणी गटविकास अधिकारी, पंचायत समिती मेहकर यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. पंचायतीच्या सात सदस्यांनी केलेल्या तक्रारीमध्ये प्रथमदर्शनी तथ्य आढळून आलेले नाही.

(४) ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्यांना विश्वासात घेऊन नियमानुसार कामे करण्याबाबत ग्रामपंचायतीचे सरपंच व सचिव यांना गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मेहकर यांनी दि. १०/११/२०१६ च्या पत्रान्वये सूचना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ५० हजार कि.मी. रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(५) ६७६४५ (२७-०१-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ९० हजार ५३२ कि.मी. च्या रस्त्यांपैकी ५० हजार कि.मी. लांबीच्या रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याची माहिती मा.वित्त मंत्री यांनी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी ३० हजार कोटी रुपयांची आवश्यकता असून ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता शासनाने निधीची तरतूद केली नसल्याने रस्ते दुरुस्तीच्या कामास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) राज्यातील साधारणत: २ लाख ३० हजार कि.मी.रस्त्यांपैकी ६५ हजार कि.मी.चे रस्ते दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्याची माहिती मा.मंत्री (वित्त) यांनी सन २०१६ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये सभागृहात दिली आहे.

(२), (३) व (४) सन २०१६ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये सभागृहाला मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांनी आश्वासित केल्यानुसार पुढील ३ वर्षात ग्रामीण रस्त्यांकरीता २३ हजार कोटी रुपयांचा निधी उभारण्याबाबत मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीच्या निधीमध्ये व डोंगरी विकास योजनेअंतर्गत निधीमध्ये वाढ करणे संदर्भात दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. तथापि, शासनाच्या महसूल व उत्पन्नाचे स्त्रोत विचारात घेता सद्यस्थितीत एवढा निधी उपलब्ध करुन देणे शक्य नसल्याचे सूचित करण्यात आले आहे.

---

**आषाणे (ता.कर्जत, जि.रायगड) ठाकूरवाडीतील बंद असलेला रस्ता सुरु करण्याबाबत**

**(६) ६९८९३ (२४-०१-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आषाणे (ता.कर्जत, जि.रायगड) ठाकूरवाडीतील अनेक वर्षापासून बंद असलेला रस्ता सुरु करण्याबाबत तेथील आदिवासी बांधवांनी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रादेशिक कार्यालय, मुंबई तसेच अधिक्षक, सार्वजनिक बांधकाम विभाग, रायगड यांच्याकडे वारंवार लेखी निवेदन देऊनही अद्यापी कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बंद असलेला रस्ता तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) जिल्हा परिषदेमार्फत रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

(३) प्रश्नांकित राज्यमार्ग क्र.७६ ते आषाणे गाव ते आषाणे ठाकूरवाडी हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. १३५ असून त्याची एकूण लांबी ३.१० कि.मी. आहे. या रस्त्याच्या एकूण लांबीपैकी ०/६९० ते ०/८८५ कि.मी. मध्ये खाजगी जमीन व १/०६५ ते ३/१०० कि.मी. मध्ये वन जमीन आहे. सदरचा भाग वगळता रस्त्यावरील वाहतुक सुरु आहे.

खाजगी जमीन संपादीत करुन घेणे व वनजमिनीच्या भूसंपादनाबाबत वनहक्क समितीचा ठराव करणेबाबत सरपंच, ग्रामपंचायत माणगांव यांना जिल्हा परिषदेमार्फत कळविण्यात आले आहे.

तसेच उर्वरीत १/०२५ कि.मी.लांबीचे डांबरीकरण व कॉंक्रिटीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील कोटेकल्लुर (ता.देगलुर) व टाकळी (ता.बिलोली) येथील अपुर्ण असलेल्या निम्न पातळी बंधाऱ्याच्या कामास आवश्यक निधी मिळण्याबाबत**

**(७) ७०५४० (२७-०१-२०१७). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील कोटेकल्लुर (ता.देगलुर) व टाकळी (ता.बिलोली) येथील अपुर्ण असलेल्या निम्न पातळी बंधाऱ्याच्या कामास आवश्यक निधीचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ औरंगाबाद यांच्याकडून मागविल्यानुसार शासनास प्राप्त झाला आहे काय, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी उपलब्धतेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्यापी मागणी प्रस्ताव प्राप्त झाला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०१-२०१८) :** (१) नाही. तथापि, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांचेकडील उर्ध्व मानार प्रकल्पांतर्गत कोटेकल्लूर बंधारा(ता. देगलूर) व टाकळी बंधारा(ता. बिलोली) हे घटक कामे प्रगतीपथावर आहे.
(२) सन २०१७-१८ या वित्तिय वर्षात कोटेकल्लूर बंधाऱ्यासाठी रू.४.४७ कोटी व टाकळी बंधाऱ्यासाठी रू. ६.५३ कोटी(एकूण रू.११.०० कोटी) निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सर्व ग्रामपंचायत कर्मचा-यांना चतुर्थ श्रेणी लागु करण्याबाबत

**(८) ७१२४८ (२७-०१-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व ग्रामपंचायत कर्मचा-यांना चतुर्थ श्रेणी लागु करण्याबाबत महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियन ता. चंद्रपूर यांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०१-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) व (३) महाराष्ट्र राज्यातील ग्रामपंचायत कर्मचा-यांना उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०७/०८/२०१३ च्या अधिसूचनेनुसार वेतन देण्यात येते. सद्य:स्थितीत त्यांना चतुर्थश्रेणी लागू करण्याबाबत शासन स्तरावर प्रस्ताव विचाराधीन नाही. तथापि नगरपालिकांमध्ये वेतनश्रेणी कशा पद्धतीने दिली जाते याचा अभ्यास करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांची एक समिती नेमण्यात येत आहे.

---

## धुळे तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र.६ काटसर ते भिरडणे रस्त्याची सुधारणा करण्याबाबत

**(९) ७४४९६ (१४-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र.६ काटसर ते भिरडणे रस्ता कि.मी.०० ते ३ कि.मी. मध्ये सुधारणा करण्यासाठी (अंदाजित रक्कम २० लक्ष रु.) जिल्हा वार्षिक योजना सन २०१६-१७ अंतर्गत समावेश करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी अध्यक्ष जिल्हापरिषद, धुळे यांना दिनांक २३ नोव्हेंबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने जिल्हा वार्षिक योजना सन २०१६-१७ मध्ये सदर कामाचा समावेश करुन निधी पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद धुळे यांनी सदरचे काम लेखाशिर्ष ५०५४ अंतर्गत समावेश करण्याबाबत प्रस्तावित केले होते. त्यास मंजूरी मिळालेली नसल्याने सदर काम सन २०१७-१८ च्या जिल्हा वार्षिक नियोजन आराखड्यात समाविष्ठ करण्याबाबत जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे मिळकतखार-मळा (ता.अलिबाग, जि.रायगड) या जोड रस्त्याच्या दुरूस्तीबाबत**

**(१०) ७६५५१ (१५-०४-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मिळकतखार-मळा (ता.अलिबाग,जि.रायगड) ग्रामीण जोड रस्ता क्र.२६१ सन २००३ पासून दुरूस्त करण्यात आला नसून सदर ग्रामीण जोड रस्ता तयार करण्यासाठी मिळकतखार येथील ग्रामस्थांनी माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय व पाहणीनुसार मिळकतखार-मळा ग्रामीण जोड रस्ता तयार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) मौजे मिळखतकार-मळा या ग्रामीण जोड मार्ग क्र. २६१ सन २००३ पासून दुरुस्त करण्यात आला नाही हे खरे आहे. परंतु माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान येथील ग्रामस्थांनी निवेदन दिल्याचे आढळून येत नाही.
(२) सदर रस्त्याची पहाणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून प्रश्नांकित रस्त्याची एकूण लांबी १.०० कि.मी. आहे.त्यापैकी ६०० मी.डांबरी पृष्ठभाग असून उर्वरीत ४०० मी.लांबी मुरुमी पाऊलवाटेची आहे.

सदर रस्ता ५०५४ ४१२१ इतर जिल्हा ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण या लेखाशिर्षांतर्गत सन २०१७-१८ च्या आराखड्यात प्रस्तावित करण्यात आले आहे. या कामास मंजूरी व निधी प्राप्त होताच काम हाती घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुनखेडा (ता.रावेर जि.जळगाव) येथील भोकर नदीवरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(११) ८०५१४ (१२-०४-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुनखेडा (ता.रावेर,जि.जळगाव) येथील भोकर नदीवरील ५० मीटर लांबी असलेल्या पुलाची दुरवस्था झाल्यामुळे पूल वाहतुकीस अत्यंत धोकादायक झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली आहे.

(३) रस्ते विकास योजना २००१-२०२१ अंतर्गत रावेर-पुनखेडा-थेरोळा-धुरखेडा हा ग्रामीण मार्ग क्र.११ असून त्याची एकूण लांबी १२.०० कि.मी. आहे. या रस्त्यावर १/८०० कि.मी. मध्ये सबमर्सीबल कॅाजवे आहे. सद्यस्थितीत पुल धोकादायक झाला असल्याने पुलावरुन होणारी वाहतुक बंद करण्यात आलेली असून वाहतुक सुरळीत राहणेसाठी पुलाजवळ तात्पुरत्या स्वरुपाचा वळण रस्ता तयार करण्यात आला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जिल्हा नियोजन समितीकडे नवीन पुलाचे काम मंजूर होण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तामसा (जि.नांदेड) येथील आठवडी बाजारातील रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(१२) ८०७२९ (१७-०४-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तामसा (जि.नांदेड) येथील आठवडी बाजारातील मागील दोन वर्षापूर्वीच १० लाख रुपये खर्च करुनही डांबरी रस्ता बनविण्यात आला असून एकाच रात्री रस्ता उखडून टाकल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा रस्ता सी.सी. रस्ता करण्याचा गुत्त्तेदार आणि संबधित शाखा अभियंत्यांनी गैरकारभार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास,चौकशीनुसार रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील वालदेवी नदीपात्रातील चेहेडी व बेलतगव्हाण रस्त्यांना जोडणाऱ्या पुलाची झालेली दुरवस्था**

**(१३) ८२७६४ (१२-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील वालदेवी नदीपात्रातील चेहेडी व बेलतगव्हाण रस्त्यांना जोडणाऱ्या पुलाची दुरवस्था झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर पुलाची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर पुलाची पहाणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे.
(३) चेहडी व बेलतगव्हाण गावांना जोडणा-या ग्रामीण मार्ग क्र.४९ च्या साखळी क्र.२/८०० मध्ये वालदेवी नदी आहे. या नदीवर ५.५० मीटरचे १० गाळे असलेला बुडणारा पुल आहे. अतिवृष्टीदरम्यान आलेल्या पुरामुळे वेअरिंग कोर्सचा काही भाग वाहून गेला आहे.

सद्यस्थितीत पुलाला धोका नसून वाहतुक सुरु आहे.

या पुलाच्या दुरुस्तीचे काम सन २०१७-१८मध्ये रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील ग्रामीण भागामधील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता निधी मिळण्याबाबत**

**(१४) ८५०६२ (१८-०८-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील ग्रामीण भागामधील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता मागील तीन वर्षापासुन निधीच मिळाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१३-१४ या वर्शांमध्ये अतिवृष्टीमुळे ग्रामीण भागातील ८०३ रस्ते व ३०६ पुल खराब झाल्यामुळे त्याची दुरूस्ती करीता नागपूर जिल्हा परिषदेने त्यावेळी शासनाकडे १५८ कोटी निधीची मागणी केली असता शासनाने केवळ ३२ कोटी रूपये नागपूर जिल्हा परिषदेला दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१५-१६ मध्ये नागपूर जिल्हयात झालेल्या अतिवृष्टीकरीता नागपूर जिल्हा परिषदेने ९७ कोटी रूपयाची मागणी केली ज्यापैकी कुठलाही निधी नागपूर जिल्हा परिषदेला अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नागपूर जिल्हा परिषदेला सन २०१३-१४ चा उर्वरीत निधी व सन २०१५-१६ चा मागणी केलेला निधी तात्काळ वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सन २०१५-१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे रु. १२२.६१ कोटी रक्कमेचा प्रस्ताव सादर केला होता. त्यानुषंगाने जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत रु.२८७.९१ लक्ष इतक्या रक्कमेची २५ कामे घेण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबेत (जि.रायगड) बौध्दवाडीला जोडणा-या साकव पुलांची झालेली दुरवस्था**

**(१५) ८६०१९ (११-०८-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेत (जि.रायगड) बौध्दवाडीला जोडणाऱ्या साकव पुलांची दुरवस्था झाली असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पुलाचा मधला भाग व पिलर तुटला असून याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पुलाची पाहणी शासनाने केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तदनुसार पुलाच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही. प्रश्नांकित साकवाची दुरुस्ती ग्रामपंचायत आंबेत यांच्यामार्फत करण्यात आली असून सद्यस्थितीत साकव सुस्थितीत आहे. सदर साकवावरुन वाहतुक सुरु आहे.
(३) व (४) जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली आहे. आंबेत बौध्दवाडी या ग्रामीण मार्ग क्र. ४१ वर कॉंक्रीट बांधकाम असलेला ३.०० मी.उंचीचा साकव आहे. या साकवाची कायमस्वरुपी दुरुस्ती करण्यासाठी रु. १०.०० लक्षचे अंदाजपत्रक तयार करुन जिल्हा नियोजन समितीकडे निधी मंजूरीसाठी जिल्हा परिषदेमार्फत पाठविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गिरोली बु. (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील रस्त्यांची उंची वाढविण्याबाबत**

**(१६) ८६६९४ (१२-०८-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गिरोली बु. (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील शेतात जाणारा रस्ता तलावातून सेतू बांधून टाकलेला असल्याने पावसाळयात सेतुवर तीन ते चार फूट पाणी साचत असल्याने गावक-यांनी सदर रस्त्यांची उंची पाण्याच्या पातळीच्या वर दोन फूट वाढविण्याबाबत भूसिंचन उपविभागीय अधिकारी, जि.प बुलढाणा तसेच तहसिलदार यांच्याकडे दिनांक २६ एप्रिल,२०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार करुन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने रस्त्यांची उंची वाढविण्यासह निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१७-१८ मध्ये जिल्हा परिषद सेस फंडामधून रु.५.०० लक्ष निधीची तरतूद करुन पावसाळ्यापूर्वी रस्त्याची उंची वाढविण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खटकाळी ते समगा (ता.जि.हिंगोली) या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(१७) ८६८९७ (२१-०८-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खटकाळी ते समगा (ता.जि.हिंगोली) या रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाब स्थानिक लोकप्रतिनिधी कळमनुरी व ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांच्या निदर्शनास आणून दिली असून रस्त्याची दुरुस्ती न झाल्यास ग्रामस्थांनी उपोषणाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय व पाहणीनुसार उक्त रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(३) प्रश्नाधिन रस्ता प्ररामा ०७ वर चिखलवाडी, समगा, दुर्गधाणी असा रस्ता असून इतर जिल्हा मार्ग क्र.३५ दर्जाचा आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी ३.०० कि.मी. आहे. प्ररामा ०७ पासून ०/०० ते १/०० कि.मी लांबीतील रस्ता सुस्थितीत आहे. तसेच २/६०० ते ३/०० कि.मी. या लांबीतील रस्त्याच्या दुरुस्तीचे काम पुरहानी कार्यक्रमातून सन २०१५-१६ मध्ये करण्यात आले असून सुस्थितीत आहे.

१/०० ते २/६०० ही लांबी नादुरुस्त असून त्यापैकी रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०१६-१७ मध्ये रु.२०.०० लक्ष किमतीचे रस्ता दुरुस्तीचे काम मंजूर आहे. उर्वरीत लांबीच्या दुरुस्तीचे काम सन २०१७-१८ चे रस्ते विशेष दुरुस्तीचे कार्यक्रमात समाविष्ट करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील आजरा-चितळे मार्गावर पुल बांधण्याबाबत**

**(१८) ८७०४० (१२-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील आजरा-चितळे मार्गावर पुल बांधण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून उक्त मार्गावर पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-०१-२०१८) :** (१) होय.

(२) उचंगी प्रकल्पाच्या बुडित क्षेत्रामध्ये सध्या अस्तित्वात असलेला आजरा-चंदगड रस्त्याचा म्हणजेच प्रजिमा क्र. ७० चा जवळपास ७७५ मीटर भाग बुडित क्षेत्रात येतो. सदर रस्ता उंच करुन त्यावर एक पूल व दोन मोरी बांधकामे प्रस्तावित आहेत. पैकी पुलाचे काम पूर्ण झाले आहे. मोरी बांधकामासाठी निविदा निश्चित झालेली आहे.

(३) पुनर्वसनाची अडचण असून, प्रकल्पग्रस्तांचा बांधकामास तीव्र विरोध आहे. पुनर्वसनाचा प्रश्न सुटल्यानंतर घळभरणीपूर्वी सदरील कामे पूर्ण करणेचे नियोजन आहे.

---

**पेठवडगांव ते तासगांव (जि.कोल्हापूर) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१९) ८७२२२ (१२-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेठवडगांव ते तासगांव (जि.कोल्हापूर) हा सहा कि.मी. लांबीचा रस्ता तेरा वर्षापासून अत्यंत नादुरुस्त अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्ती अभावी या रस्त्यावर अनेक छोटे-मोठे अपघात होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) अंशत खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर रस्त्यांची पहाणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून प्रश्नांकित पेठवडगांव ते तासगांव हा रस्ता प्रा.रा.मा. ६ पासून हेरले मौजे वडगाव तासगाव ते पेठवडगाव या इतर जिल्हा मार्ग क्र. १९२ चा भाग रस्ता असून त्याची लांबी ३.४०० कि.मी. आहे. या लांबीपैकी १.५०० कि.मी. लांबीचे सुधारणा करण्याचे काम सन २०१६-१७ मध्ये जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त निधीमधून करण्यात आले आहे. उर्वरीत १.९०० कि.मी. लांबीच्या रस्त्याची दुरुस्ती निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कार्जिणे (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) साठवण तलावात पाणी साठविण्यासाठी तलावाचे काम करणेबाबत**

**(२०) ८७४९९ (१८-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कार्जिणे (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) या साठवण तलावात पावसाळयात पाणी साठविण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१७ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार सदर साठवण तलावात पाणी साठविण्यासाठी तलावाचे काम करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर साठवण तलावाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०६-०१-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) सदर प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येऊन मे २०१७ अखेर प्रकल्पाचे काम पूर्ण करणेत आले आहे. प्रकल्पाची साठवणक्षमता ४.३४ द.ल.घ.मी. इतकी असून, दि.११/९/२०१७ रोजी प्रकल्पात ३.७८३ द.ल.घ.मी. (८७.२७ %) इतका पाणीसाठा झालेला आहे.

---

**भडगाव-समर्थनगर-चिंचेवाडी-सामानगड-नौकुड-येणेचवंडी-बसर्गे-हलकर्णी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(२१) ८७५१५ (१२-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भडगाव-समर्थनगर-चिंचेवाडी-सामानगड-नौकुड-येणेचवंडी-बसर्गे-हलकर्णी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) या रस्त्याची दुरुस्ती करण्याच्या मागणीसाठी भडगाव येथे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान रास्ता रोको आंदोलन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रश्नांकित रस्ता प्रजिमा ५७ पासून चिंचवाडी नौकुड इजिमा १२० ला मिळणारा इतर जिल्हा मार्ग क्र. १२३ असून त्याची एकूण लांबी ९.०० कि.मी. आहे. या रस्त्याचा ०/०० ते ७/६०० कि.मी. डांबरी पृष्ठभाग खराब झाला असून त्याची तात्पुरती दुरुस्ती करण्यासाठी रु. १.४३ लक्ष मंजूर आहेत.

प्रश्नाधिन रस्ता हा मुख्यमंत्री ग्रामसडक योजना सन २०१७-१८ च्या उद्दिष्टामध्ये गडहिंग्लज तालुक्याच्या प्राधान्यक्रम यादीमध्ये एक नंबरला समाविष्ट असून सर्व्हेक्षणाचे काम सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खर्डी (जि.ठाणे) शहराजवळ असलेल्या धामणी-तळेखाण पुलाची झालेली दुरवस्था**

**(२२) ८७७२६ (१२-०८-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खर्डी (जि.ठाणे) शहराजवळ असलेल्या धामणी-तळेखाण पुलाची मोठया प्रमाणात दुरवस्था झाली असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर पुलाची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर पुलाची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे.हा साकव पादचारी साकव म्हणून तयार करण्यात आला होता, तथापि त्यावरुन दुचाकी व चारचाकी वाहनांची वाहतुक सुरु होती.

साकवाचा पत्रा काही भागात तुटलेला असल्याने चारचाकी वाहनांच्या वाहतुकीसाठी सदर साकव बंद करण्यात आलेला आहे. या साकवाच्या दुरुस्तीचे काम सन २०१७-१८ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेमधून मंजूर असून निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्री.क्षेत्र लाखनवाडी ते करजगाव फाटा (ता.अचलपूर, जि.अमरावती)**
**या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(२३) ८८०४८ (१९-०८-२०१७). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीक्षेत्र लाखनवाडी ते करजगाव फाटा (ता.अचलपूर, जि.अमरावती) या ५ कि.मी.लांबीच्या रस्त्यात मोठ्या प्रमाणात खड्डे असल्यामुळे वाहनचालकांना तसेच प्रवाशांना त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने उक्त रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) प्रश्नांकित रामा-२४ पासून बहिरम-बोदवड-करजगाव-लाखनवाडी तळेगाव मोहना हा रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.१४ असून त्याची एकूण लांबी १५.०० कि.मी. आहे. यापैकी ०/०० ते १२/५०० कि.मी. लांबी ही मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या कोअर नेटवर्क मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

सन २०१६-१७ मध्ये सदर रस्त्याचे तात्पुरत्या स्वरुपात खड्डे भरण्यासाठी रु.२.०० लक्ष मंजूर झालेले असून खड्डे भरण्याचे काम सुरु करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील पाली भूतीवली धरणाच्या वरच्या भागात आणि माथेरानच्या पायथ्याच्या रांगेत असलेल्या आदिवासी वाडयांपर्यंत रस्ता नसल्याबाबत**

**(२४) ८८१७३ (२२-०८-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील पाली भूतीवली धरणाच्या वरच्या भागात आणि माथेरानच्या पायथ्याच्या रांगेत असलेल्या आदिवासी वाडयांपर्यंत रस्ता नसल्याने आदिवासी जनतेला दळणवळणाकरीता गैरसोय होत असल्याने रस्ता होण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी गेल्या ५ वर्षापासून वारंवार मागणी करुनही अद्यापी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार आदिवासी वाडयांमध्ये रस्ते बांधण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) कर्जत तालुक्यातील पाली भुतवली धरणाच्या वरच्या बाजूस व माथेरानच्या पायथ्याशी रांगेत असलेल्या वाड्यांना जोडणारा रस्ता रस्ते विकास योजना २००१-२०२१ नुसार ग्रामीण मार्ग दर्जाचा असून त्याचा क्रमांक १४८ असा आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी १३.५० कि.मी. आहे.

किरवली ते किरवली ठाकूरवाडी, सावरगाव, ठाकूरवाडी, आषाणेवाडी, चिंचवाडी, सागाचीवाडी, बोरीचीवाडी, भुतवलीवाडी, नाग्याचीवाडी, आसलवाडी, बेकरेवाडी, धनगरवाडी मार्ग, ग्रामीण मार्ग क्र. १४८ या वाड्यांना जोडला जातो.

सदर ठिकाणी भौगोलीक परिस्थितीचा विचार करता हा रस्ता वन विभागातून तसेच अतिदुर्गम व अतिसंवेदनशील म्हणजेच Eco Sensetive Zone मध्ये समाविष्ट आहे.

त्यामुळे हा रस्ता करणे जिल्हा परिषदेला शक्य होत नाही.

---

### गौळवाडी-वैजनाथ-मांडवणे (ता.कर्जत, जि.रायगड) या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(२५) ८८८३७ (१२-०८-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गौळवाडी-वैजनाथ-मांडवणे (ता.कर्जत, जि.रायगड) या रस्त्याची टाटा पॉवर कंपनी परिसरात दुरवस्था होऊन रस्त्यातील दगड वर आल्याने वाहन चालकांना वाहने चालविने अडचणीचे होत असून मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी वारंवार करुन सुद्धा अद्याप कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती न करण्याची कारणे काय आहे,
(४) असल्यास, उक्त रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) अंशत. खरे आहे.
(२) व (३) अशा प्रकारची मागणी प्राप्त झाल्याची आढळून येत नाही.
(४) भिवपूरी वैजनाथ गौळवाडी भालिवडी वंजारवाडी ते राज्यमार्ग ७९ ला जोडणारा मार्ग इतर जिल्हा मार्ग क्र. ३० असून या रस्त्याच्या दुरुस्ती मंजूरीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे जिल्हा परिषदेमार्फत पाठविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील रहाटेवाडी-तामदर्डीच्या सीमेवर असलेल्या पूलाची झालेली दुरवस्था

**(२६) ८८९६१ (२२-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रहाटेवाडी-तामदर्डीच्या (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) सीमेवर असलेल्या पूलाचे संरक्षक कठडे तुटले असून पूलाची दुरवस्था झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळयात येथील ओढ्यातील अतिरिक्त पाणी हे ओढयातून न वाहता शेतातून वाहत असल्याने शेतक-यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून येथील पुलाची दुरुस्ती करण्यासह ओढयाचे खोलीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही. सदरचा पुल हा लो लेवल कॉजवे या प्रकारचा आहे. यामुळे यावर कठडे नसतात. रस्त्याच्या कडेला गार्ड स्टोन आहेत. सद्यस्थितीत सदरचा पुल वाहतुकीस योग्य असून वाहतुक सुरळीत सुरु आहे.

(२) सदरचा लो लेवल कॉजवे पुल हा सबमर्सिबल म्हणजेच पुर आल्यास पाण्याखाली जाणारा या प्रकारात मोडत असल्याने तो पाण्याखाली जातो. ओढ्याचे पात्र अरुंद झाल्याने पाणी बाजूच्या शेतात जाते.

(३) याठिकाणी नवीन पुल बांधण्याची मागणी आहे. नवीन पूलाचे बांधकाम करणेचे काम हे नाबार्ड अर्थसहाय्यातून आर.आय.डी.एफ २० मधून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजूर असून सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरी घेणेबाबतची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पारगांव-मानेवाडी-मनपाडळे (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(२७) ८९२४२ (२२-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारगांव-मानेवाडी-मनपाडळेव अंबप ते अंबपवाडी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) या रस्त्यांची दुरवस्था झाली असून सदरच्या रस्त्यांची तातडीने दुरूस्ती न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा तेथील ग्रामस्थांनी दिल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) रस्त्याची दुरावस्था झाली हे खरे आहे परंतु आंदोलन करण्याचा इशारा स्थानिक नागरीकांनी दिलेला नाही.

(२) जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

(३) प्रश्नामध्ये एकूण ३ रस्त्यांचा समावेश आहे. पाडळी पारगांव निल्लेवाडी ते जिल्हा हद्द इतर जिल्हा मार्ग क्र. २६, व रा.मा. क्र.१९९ पासून कासारवाडी अंबपवाडी अंबप तळसंदे चावरे इतर जिल्हा मार्ग क्र. १८२ हे दोन रस्ते जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असून मनपाडळे पाडळी हा प्रमुख जिल्हा मार्ग असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे.

अ) पाडळी पारगांव निल्लेवाडी ते जिलाह हद्द या इतर जिल्हा मार्ग क्र.२६ या रस्त्याची एकूण लांबी ९.७०० कि.मी. इतकी असून ०/०० ते ३/०० कि.मी. मध्ये खड्डे पडले असून रस्ता दुरुस्त करणे आवश्यक आहे.

ब) रा.मा. क्र.१९९ पासून कासारवाडी अंबपवाडी अंबप तळसंदे चावरे इतर जिल्हा मार्ग क्र. १८२ या रस्त्याची एकूण लांबी १२.२०० कि.मी. इतकी असून संपूर्ण लांबी डांबरी पृष्ठभागाची आहे. त्यापैकी ४/०० ते ४/६०० कि.मी. डांबरी पृष्ठभाग खराब झाला असून दुरुस्त करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत रस्त्याची किरकोळ दुरुस्ती मैलकामगार यांच्याकडून करण्यात आली आहे.

तसेच जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या अ व ब येथील रस्त्यांच्या नादुरुस्त लांबीतील दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

क) मनपाडळी-मानेवाडी दरम्यानचा रस्ता हा प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१३ चा भाग आहे. या १.३०० कि.मी. भाग रस्त्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ५०५४ मार्ग व पूल नाबार्ड-२१ योजनेअंतर्गत काम पूर्ण करण्यात आले असून सद्यस्थितीत रस्ता सुस्थितीत आहे व वाहतुक सुरळीत सुरु आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चळणी (जि.पालघर) नदीवरील पूलाची झालेली दुरवस्था**

**(२८) ८९७८७ (२२-०८-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चळणी (जि.पालघर) नदीवरील पूलाचा काही भाग पावसाळ्यात कोसळला असून पुलाला विवर पडल्याने पूल वाहतुकीस धोकादायक झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार सदर पुलाची दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) जिल्हा परिषदेमार्फत सदर पुलाची पाहणी करण्यात आली असून रा.मा. क्र.७२ ते चळणी गांगोडी ते शेणसरी रस्ता हा इतर जिल्हा मार्ग क्र. ३४ असून या रस्त्याच्या साखळी क्र.१/८०० मध्ये नदीवर पूल नसून ९०० मि.मि.व्यासाचा आर.सी.सी. पाईपचा १० रांगा असलेला साकव आहे. सदर साकवाच्या जोड रस्त्याच्या डाव्या बाजुकडील भराव अतिवृष्टीमुळे पुराच्या पाण्याने ढासळलेला होता.

सदर वाहुन गेलेला भराव तातडीने संरक्षित करण्यात आलेला असून वाहतुक सुरळीत सुरु आहे.

सन २०१७-१८ मध्ये ५०५४ मार्ग व पूल जनजाती क्षेत्र या लेखाशिर्षाखाली सदर रस्त्याच्या धावपट्टीचे व साकवाच्या दोन्ही बाजुच्या जोडरस्त्यास संरक्षक भिंतीसह मजबुतीकरण करण्याचे काम जिल्हा परिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे-शेगाव (खोटरे), (ता.सेनगाव, जि.हिंगोली) येथील शेगाव, खैरखेडा येथील प्रकल्प बाधितांसाठी पेय जल मंजूर करण्याबाबत**

**(२९) ९००७६ (११-०८-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे-शेगाव (खोटरे), (ता.सेनगाव, जि.हिंगोली) येथील साठवण तलावाचे मंजूर काम तसेच सदर जागेतील बुडीत क्षेत्रात विस्थापित होणाऱ्या अनुक्रमे गट क्र. २०३ ते २०९, १२८ ते १३३ या अनुक्रमे शेगाव, खैरखेडा येथील प्रकल्प बाधितांसाठी पेय जल तातडीने मंजूर करण्याबाबत राष्ट्रीय अपंग विकास महासंघाच्या जिल्हाध्यक्ष तसेच कार्यध्यक्ष यांनी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (जलसंधारण), मा.राज्यमंत्री (जलसंधारण) व प्रधान सचिव (जलसंधारण) आणि जिल्हाधिकारी

(हिंगोली), मुख्य कार्यपालन अधिकारी (जिल्हापरिषद हिंगोली) आणि संबंधित विभागाचे सक्षम प्राधिकारी यांच्याकडे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्याचे प्रस्तावित केले आहे,
(३) असल्यास, माहे जून, २०१७ अखेरपर्यंत किती जिल्हा प्रशासनाकडून या संदर्भातील प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहे व त्यापैकी किती प्रस्तावास तत्वतः मंजुरी प्रत्यार्पित करण्यात आली आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-०१-२०१८) :** (१) नाही, तथापि शेगांव गावचे ग्रामपंचायतीने दि.२०-०१-२०१६ रोजी निवेदन देऊन गाव तलावाचे काम पूर्ण करणेबाबत विनंती केली आहे.
(२) सदर योजना स्थानिक, जिल्हास्तरीय असल्यामुळे जलसंपदा विभागास निधी उपलब्ध होत नाही. तलावाची साठवण क्षमता ०.११ दलघमी इतकी अल्प असल्यामुळे तसेच तलावात ३ ते ४ महिने पाणीसाठा राहू शकतो. या योजनेमधून पेयजल योजनेसाठी बारमाही पाणी उपलब्ध होऊ शकणार नाही.

मौजे शेगांव (खोडके) ता. सेनगांव, जि. हिंगोली येथील गाव तलाव रोजगार हमी योजनेतून वगळण्यात आला असून पाणीसाठा झालेला नाही. १०० हेक्टर पर्यंतचे प्रकल्प स्थानिक स्तर / जिल्हापरिषद या यंत्रणेकडे आहेत. यासंबंधी कार्यवाही जलसंधारण विभागामार्फत होणे आवश्यक आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील दहिगाव नांदुरा रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३०) ९०६०५ (११-०८-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील दहिगाव नांदुरा रस्त्याची दुरवस्था झाल्याने परिसरातील नागरिकांना या रस्त्याने दळणवळण करणे गैरसोयीचे होत असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता २ कि.मी. लांबीचा नादुरुस्त असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ५० लक्ष रु. निधीची आवश्यकता असून सदर रस्ता दुरुस्तीबाबत लोकप्रतिनिधीनी कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय व त्यानुसार रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी देऊन रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) अंशत खरे आहे.
(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) दहिगाव ते नांदुरा हा रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र. ३९ चा भागरस्ता आहे. या भाग रस्त्याची लांबी ५.०० कि.मी. असून संपूर्ण पृष्ठभाग डांबरी आहे. या एकूण लांबीपैकी २/०० ते ५/०० कि.मी. ही ३ कि.मी.लांबी सुस्थितीत आहे. ०/०० ते २/०० या लांबीमधील रस्ता दुरुस्तीचे काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे. सद्यस्थितीत या रस्त्यावर वाहतुक सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे शिरसोडी चांदूर बिस्वा रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३१) ९०६०९ (११-०८-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे शिरसोडी चांदूर बिस्वा रस्त्याची दुरवस्था झाल्याने परिसरातील नागरिकांना या रस्त्याने दळणवळण करणे गैरसोयीचे होत असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता २ कि.मी. लांबीचा नादुरुस्त असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ७० लक्ष रु. निधीची आवश्यकता असून सदर रस्ता दुरुस्तीबाबत लोकप्रतिनिधीनी कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय व पाहणीनुसार रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी देऊन रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) अंशत खरे आहे.
(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) शिरसोडी चांदूरबिस्वा हा रस्ता शिरसोडी चांदूरबिस्वा भिलवडी ते खुमगांव रेल्वेस्टेशन ते अलमपूर या इतर जिल्हा मार्ग क्र. ४० चा भाग रस्ता आहे. या भाग रस्त्याची लांबी ३/०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते १/७०० कि.मी. लांबी डांबरी पृष्ठभागाची असून सुस्थितीत आहे. उर्वरीत १/७०० ते ३/०० कि.मी. लांबी मुरुमी असून सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु.६०.०० लक्ष निधीची आवश्यकता आहे. सन २०१७-१८ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी व निकषाच्या अधिन राहून सदर रस्त्याचे काम प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे. सद्यस्थितीत सदर रस्त्यावर वाहतुक सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील पातोंडा - अलमपूर रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३२) ९०६१५ (११-०८-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे पातोंडा अलमपूर रस्त्याची दुरवस्था झाल्याने परिसरातील नागरिकांना या रस्त्याने दळणवळण करणे गैरसोयीचे होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता ३ कि.मी. लांबीचा नादुरुस्त असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ७० लक्ष रु. निधीची आवश्यकता असून सदर रस्ता दुरुस्तीबाबत लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय व पाहणीनुसार रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी देऊन रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) सदर रस्त्याची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली असून पातोंडा-अलमपूर हा रस्ता कोदरखेड पातोंडा अलमपूर येरळी रा.मा. २७४ ला जोडणारा या इतर जिल्हा मार्ग क्र. ४१ चा भाग रस्ता आहे. या भाग रस्त्याची लांबी ३.२०० कि.मी. आहे. हा संपूर्ण रस्ता डांबरी पृष्ठभागाचा आहे. सदर रस्त्याच्या लांबीपैकी १/२०० ते ३/२०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे. उर्वरीत ०/०० ते १/२०० कि.मी. लांबीमधील रस्ता दुरुस्तीसाठी रु.२५.०० लक्ष निधीची आवश्यकता असून सन २०१७-१८ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी व निकषाच्या अधिन राहून सदर काम प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे. सदर रस्त्यावर वाहतुक सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मलकापूर (ता.नांदुरा,जि.बुलढाणा) येथील रा. मा. क्र. ६ ते नायगाव तिकोडी या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३३) ९०६१७ (२२-०८-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील रा. मा. क्र. ६ ते नायगाव तिकोडी मार्ग नादुरुस्त असून सदर रस्ता नादुरुस्त असल्यामुळे परिसरातील नागरिकांना या रस्त्याने दळणवळण करणे गैरसोयीचे होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता २ कि.मी. लांबीचा नादुरुस्त असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ६० लक्ष रु. निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्ता दुरुस्तीबाबत स्थानीक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.प. बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी देवुन रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(४) प्रश्नांकित रा.मा. क्र.६ ते नायगांव तिकोडी (ता.नांदुरा) हा रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.४४ चा भाग रस्ता असून या भाग रस्त्याची लांबी ३.०० कि.मी. आहे. ०/०० ते ३/०० खडी नूतनीकरणाचे व ०/०० ते १/०० कि.मी. लांबीचे डांबरी नूतनीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आले असून रस्ता सुस्थितीत आहे.

१/०० ते २/३०० कि.मी. लांबीमध्ये डांबरीकरणाचे काम ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेकडे मंजूर असून सदर काम निविदा स्तरावर आहे. उर्वरीत ०.७०० कि.मी. लांबीचे डांबरीकरणाचे काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मलकापूर (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील दहिवडी रा.मा.क्र-६ मार्ग (खुमगांव) या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३४) ९०६२१ (१२-०८-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील दहिवडी रा.मा.क्र. ६ मार्ग (खुमगांव) नादुरुस्त असून सदर रस्ता नादुरुस्त असल्यामुळे परिसरातील नागरिकांना या रस्त्याने दळणवळण करणे गैरसोयीचे होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता २ कि.मी. लांबीचा नादुरुस्त असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ७० लक्ष रु. निधीची आवश्यकता असून सदर रस्ता दुरुस्तीबाबत स्थानीक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता जि.प. बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी देवुन रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) अंशत खरे आहे.

(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) रा.मा.म. क्र.६ ते दहिवडी खुमगाव हा इतर जिल्हा मार्ग क्र. ४२ चा भाग रस्ता आहे. या भाग रस्त्याची एकूण लांबी ५.८०० कि.मी. आहे. त्यापैकी २.१० कि.मी. रस्ता क्षतीग्रस्त असून त्याच्या दुरुस्तीचे काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी व निकषाच्या अधिन राहुन प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे. सद्यस्थितीत या रस्त्यावर वाहतुक सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मलकापूर (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील धानोरा-काटी रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३५) ९०६२३ (१२-०८-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील धानोरा-काटी मार्ग नादुरुस्त असून सदर रस्ता नादुरुस्त असल्यामुळे परिसरातील सर्व नागरिकांना या रस्त्याने दळणवळण करणे गैरसोयीचे होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता १ कि.मी. लांबीचा नादुरुस्त असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी २५ लक्ष रु. निधीची आवश्यकता असून सदर रस्ता दुरुस्तीबाबत स्थानीक लोकप्रतिनिधी कार्यकारी अभियंता जि.प. बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी देवुन रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) धानोरा-काटी हा रस्ता वडोदा शिरसोडी विटाळी धानोरा काटी उमाळी भाडगणी या इतर जिल्हा मार्ग क्र. ३३ चा भाग रस्ता असून या भाग रस्त्याची लांबी ३.२०० कि.मी. आहे. हा संपूर्ण रस्ता डांबरी पृष्ठभागाचा आहे. सदर रस्त्याच्या लांबीपैकी ०/०० ते २/५०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे. उर्वरीत २/५०० ते ३/२०० कि.मी. क्षतिग्रस्त लांबीची दुरुस्ती सन २०१७-१८ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे. सदर रस्त्यावर वाहतुक सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मलकापूर (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील निमखेड - डौलखेड प्र.जि.मा. ला जोडणाऱ्या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३६) ९०६२६ (२२-०८-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील निमखेड-डौलखेड प्र.जि.मा. ला जोडणारा मार्ग नादुरुस्त असून सदर रस्ता नादुरुस्त असल्यामुळे परिसरातील नागरिकांना या रस्त्याने दळणवळण करणे गैरसोयीचे होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता २ कि.मी. लांबीचा नादुरुस्त असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ५० लक्ष रु. निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ता दुरुस्तीबाबत स्थानीक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.प. बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी देवून रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) निमखेड ते डौलखेड रस्त्याची लांबी १.८०० कि.मी. असून त्यापैकी ०.८०० कि.मी. रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले असून उर्वरीत १.०० कि.मी. साठी रु. २५.०० लक्ष आवश्यक आहेत.

(३) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(४) प्रश्नांकित रस्त्याच्या १.०० कि.मी. खडीच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे आवश्यक आहे. सदर काम सन २०१७-१८ च्या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे अनुराबाद फाटा ते अनुराबाद पान्हेरा येथील रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३७) ९०६३० (१२-०८-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील अनुराबाद फाटा ते अनुराबाद पान्हेरा मार्ग नादुरुस्त असून सदर रस्ता नादुरुस्त असल्यामुळे परिसरातील नागरिकांना या रस्त्याने दळणवळण करणे गैरसोयीचे होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता १.५० कि.मी. लांबीचा नादुरुस्त असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ३० लक्ष रु. निधीची आवश्यकता असून सदर रस्ता दुरुस्तीबाबत स्थानीक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता जि.प. बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी देऊन दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) प्रश्नांकित कुंड बु रा.मा. ६ अनुराबाद फाटा ते अनुराबाद पान्हेरा मार्ग इतर जिल्हा मार्ग क्र. २९ दर्जाचा असून त्याची लांबी ८.९५० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते १/८०० कि.मी. लांबी खडीपृष्ठभागाची, १/८०० ते ४/६०० कि.मी. अस्तीत्वात नसलेली लांबी, ४/६०० ते ६/२०० कि.मी. मुरमी पृष्ठभागाची लांबी व ६/२०० ते ८/९५० कि.मी. अस्तीत्वात नसलेली लांबी आहे. अनुराबाद फाटा ते अनुराबाद गाव या ४/५०० कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न असून उर्वरीत लांबीच्या रस्ता दुरुस्ती काम विविध योजनांतर्गत प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील भानगुरा - विवरा रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३८) ९०६३१ (१८-०८-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील भानगुरा-विवरा रस्त्याची दुरवस्था झाल्याने तेथील नागरिक व दुचाकी, चारचाकी वाहन धारकांना या रस्त्याने दळणवळण करणे गैरसोयीचे होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता २ कि.मी. लांबीचा नादुरुस्त असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ४५ लक्ष रु. निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्ता दुरुस्तीबाबत स्थानीक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.प. बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. भानगुरा ते विवरा या इतर जिल्हा मार्ग क्र. ३० रस्त्याची एकूण लांबी ४.०० कि.मी. आहे. त्यापैकी २/०० ते ४/०० कि.मी.

या क्षतीग्रस्त लांबीची दुरुस्ती करण्यासाठी रु. ४९.९० लक्ष खर्च अपेक्षित आहे. या क्षतिग्रस्त लांबीची दुरुस्ती सन २०१७-१८ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

तसेच भानगुरा हे गाव रस्ता इजिमा क्र. २२ ने व विवरा हे गाव प्रजिमा क्र. ८ या डांबरी रस्त्याने जोडण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील नरवेल-हरसोडा रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३९) ९०६३३ (१८-०८-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील नरवेल-हरसोडा रस्त्याची दुरवस्था झाल्याने तेथील नागरिक व दुचाकी, चारचाकी वाहन धारकांना या रस्त्याने दळणवळण करणे गैरसोयीचे होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता २ कि.मी. लांबीचा नादुरुस्त असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ४० लक्ष रु. निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ता दुरुस्तीबाबत स्थानीक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.प. बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) व (२) अंशत खरे आहे.

(३) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. नरवेल ते हरसोडा हा रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.२४ असून त्याची एकूण लांबी ४.०० कि.मी. आहे. त्यापैकी २/०० ते ४/०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे. ०/०० ते २/०० या क्षतीग्रस्त लांबीची दुरुस्ती जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे. सद्यस्थितीत या रस्त्यावर वाहतुक सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील उमाळी-भाडगणी रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(४०) ९०६३९ (१८-०८-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील उमाळी - भाडगणी रस्त्याची दुरवस्था झाल्याने तेथील नागरिक व दुचाकी, चारचाकी वाहन धारकांना या रस्त्याने दळणवळण करणे गैरसोयीचे होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता ३ कि.मी. लांबीचा नादुरुस्त असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ७५ लक्ष रु. निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ता दुरुस्तीबाबत स्थानीक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.प. बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. उमाळी भाडगणी हा रस्ता वडोदा शिरसोडी विटाळी धानोरा काटी उमाळी भाडगणी या इतर जिल्हा मार्ग क्र. ३३ चा भाग रस्ता आहे. या भाग रस्त्याची लांबी ४.०० कि.मी. आहे. त्यापैकी १.१०० कि.मी. रस्त्याचा पृष्ठभाग डांबरी असून सुस्थितीत आहे. उर्वरीत २.९०० कि.मी. क्षतीग्रस्त रस्त्याच्या दुरुस्तीचे काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

सद्यस्थितीत या रस्त्यावर वाहतुक सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) वाहतुक समस्या सोडविण्यासाठी ४ इतर जिल्हा मार्गांची प्रमुख जिल्हा मार्ग अशी दर्जोन्नोती करण्याबाबत

**(४१) ९०९२४ (१८-०८-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) वाहतुक समस्या सोडविण्यासाठी ४ इतर जिल्हा मार्गांची प्रमुख जिल्हा मार्ग अशी दर्जोन्नोती करण्याबाबत तपासणी अहवाल सादर करण्याचा आदेश मा. मंत्री ग्रामविकास यांनी माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील आदेशाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) इचलकरंजी विधानसभा मतदार संघातील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी १) इचलकरंजी चंदूर इंगळी रस्ता इजिमा क्र.३७ २) हुपरी चंदूर कबनुर रस्ता इजिमा क्र.३६, ३) कोरोची तारदाळ निमशिरगाव रस्ता ग्रा.मा. क्र.३५ व ४) इचलकरंजी रुई चंदूर आभार बोर्ड रस्ता ग्रा.मा. क्र. ९३ या ४ इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग दर्जाच्या रस्त्यांची प्रमुख जिल्हा मार्ग दर्जोन्नतीसाठी समावेश होता.

तथापी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि. २०.७.२०१६ च्या परिपत्रकान्वये प्रमुख जिल्हा मार्ग दर्जा करीता इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची किमान १२ मी.रुंदी आवश्यक असून अनुक्रमांक १, ३ व ४ हे रस्ते ही अट पूर्ण करीत नाहीत त्यामुळे दर्जोन्नतीसाठी पात्र नाहीत. अनुक्रमांक २ येथील रस्त्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दर्जोन्नतीसाठी जिल्हा परिषदेमार्फत पाठविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे पिंपळखुटा महादेव - ते जांभूळधाबा - आळंद - वडजी रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(४२) ९०९३८ (१८-०८-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे पिंपळखुटा महादेव ते- जांभूळधाबा - आळंद - वडजी रस्त्याची दुरवस्था झाल्याने तेथील नागरिक व दुचाकी, चारचाकी वाहन धारकांना या रस्त्याने दळणवळण करणे गैरसोयीचे होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता २ कि.मी. लांबीचा नादुरुस्त असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ५० लक्ष रु. निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ता दुरुस्तीबाबत स्थानीक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.प. बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

(३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदर रस्ता दुरुस्तीबाबत कार्यकारी अभियंता, जि.प.बांधकाम विभाग बुलडाणा यांना सुचित केल्याचे आढळून येत नाही.

मौजे पिंपळखुटा महादेव-जांभुळधाबा-आळंद-वडजी हा रस्ता इतर जिल्हा मार्ग २७ दर्जाचा असून या रस्त्याची एकूण लांबी ११/५०० कि.मी. आहे. त्यापैकी पिंपळखुटा-जांभुळधाबा ते आळंद या रस्त्याची लांबी ६.५०० कि.मी. असून रस्त्याचा पृष्ठभाग डांबरी आहे. आळंद ते वडजी या रस्त्याची लांबी ५.०० कि.मी. असून यामधील १.५०० कि.मी. रस्ता मुरुमी असून उर्वरीत ३.५०० कि.मी. लांबीचा रस्ता अस्तित्वात नाही. जांभुळधाबा ते आळंद रस्त्याची लांबी ३.०० कि.मी.असून त्यापैकी १.५०० कि.मी.लांबीच्या डांबरी पृष्ठभागाची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर रस्ता दुरुस्तीसाठी रु.३०.०० लक्ष निधीची आवश्यकता आहे.

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून सदर काम प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील वाघोळा-दसरखेड-विवरा-रणगाव-भालेगाव रस्त्याची झालेली दुरवस्था

**(४३) ९०९४४ (१८-०८-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे वाघोळा-दसरखेड-विवरा-रणगाव-भालेगाव रस्त्याची दुरवस्था झाल्याने तेथील नागरिक व दुचाकी, चारचाकी वाहन धारकांना या रस्त्याने दळणवळण करणे गैरसोयीचे होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता ३ कि.मी. लांबीचा नादुरुस्त असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ७५ लक्ष रु. निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ता दुरुस्तीबाबत स्थानीक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.प. बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) व (२) अंशत खरे आहे.

(३) प्रश्नांकित रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र. ३६ चा भागरस्ता आहे. वाघोळा ते दसरखेड या भाग रस्त्याची लांबी ३/०० कि.मी. आहे. विवरा ते रणगाव भागरस्त्याच्या २/८०० कि.मी. लांबीपैकी १/८०० कि.मी. चा रस्ता अस्तित्वात नाही. उर्वरीत रस्ता सुस्थितीत आहे. रणगाव ते भालेगांव व भालेगांव पोच मार्गाची लांबी ३.०० कि.मी. असून या रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

दसरखेड-विवरा हा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्र. ८ दर्जाचा असून सुस्थितीत आहे.

वरील इतर जिल्हा मार्ग क्र. ३६ च्या क्षतिग्रस्त भाग रस्त्याच्या दुरुस्तीचा प्रस्ताव जिल्हा वार्षिक योजना सन २०१७-१८ अंतर्गत निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खानापूर आणि आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्त करण्याबाबत

**(४४) ९१५२८ (१९-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर आणि आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था झाली असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता वारंवार तेथील नागरीकांनी संबंधीत अधिका-यांना निवेदनेही दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांची पाहणी केली आहे काय व पाहणीत काय आढळून आले,
(३) असल्यास,पाहणीनुसार उक्त रस्त्यांची दुरुस्ती करण्यासह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) अंशत खरे आहे.
(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्यांची पाहणी करण्यात आली आहे. खानापूर तालुक्यातील इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गाची एकूण लांबी ६८५.५७ कि.मी. असून त्यापैकी ४०५.४७ कि.मी. लांबी सुस्थितीत आहे. उर्वरीत २८०.१० कि.मी. लांबीची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

आटपाटी तालुक्यातील इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गाची एकूण लांबी ७२३.३० कि.मी. असून त्यापैकी ३७८.३० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे. उर्वरीत ३४५.०० कि.मी. लांबीची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

(३) रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते.

सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये जिल्हा वार्षिक योजना, रस्ते व पूल दुरुस्ती तसेच किरकोळ दुरुस्ती अंतर्गत खानापूर तालुक्यासाठी रु. ४५७. ४३ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यामध्ये ३१ कामे घेण्यात आली आहेत. तसेच आटपाटी तालुक्यासाठी रु.४५२.५० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यामध्ये २७ कामे जिल्हा परिषदेमार्फत घेण्यात आली आहेत.

उर्वरीत खराब रस्त्यांची दुरुस्ती जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषानुसार टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रोहा (जि.रायगड) तालुक्यातील वानरकोंड रस्त्याची झालेली दुरवस्था

**(४५) ९१८४४ (२२-०८-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रोहा (जि.रायगड) तालुक्यातील जिल्हा रायगड ग्रामपंचायत हद्दीतील वानरकोंड रस्ता हा नादुरूस्त असून रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्यामुळे नागरीकांची गैरसोय होत आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय व तद्नुसार रस्त्याचे अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन रस्त्याचे नाव वानरकोंड रस्ता नसून वांदरखोडा असे आहे.

(२) प्रश्नांकित प्रजिमा ५३ ते वांदरखोडा धनगरवाडी हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. २१४ असून या रस्त्याची एकूण लांबी २.०० कि.मी. आहे. सन २०१६-१७ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत या रस्त्याच्या ०/०० ते १/५०० कि.मी. लांबीतील बी.बी.एम. चे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आले आहे.

०/०० ते १/२०० कि.मी.मध्ये कारपेट सिलकोट व १/२०० ते २/०० कि.मी. मध्ये संपूर्ण रस्ता नवीन करण्याचे रु.३५.०० लक्षचे काम सन २०१७-१८ मध्ये जिल्हा नियोजन समितीकडे जिल्हा परिषदेने मंजूरीसाठी पाठविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इसवली (ता.लांजा, जि.रत्नागिरी) गावातील सुतारवाडी व्हाया रेवटेवाडी ते नवलादेवी मंदीर या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(४६) ९२०५१ (१२-०८-२०१७). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इसवली-पनोरे (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील ग्रुप ग्रामपंचायतींतर्गत येणाऱ्या इसवली गावातील सुतारवाडी व्हाया रेवटेवाडी ते नवलादेवी मंदीर या रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक नागरीकांनी मा.मुख्यमंत्री, मा.ग्रामविकास मंत्री, मुख्य कार्यकारी अभियंता यांच्याकडे दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास पत्राव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार गावातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) इसवली सुतारवाडी प्राथमिक शाळा ते रेवटेवाडी प्रजिमा ६३ ला जोडणारा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.११२ आहे. रस्त्याची एकूण लांबी ३.५०० कि.मी. असून सदर रस्त्याच्या ०.६०० कि.मी. लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम सन २०१२- २०१३ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. तसेच सन २०१५-१६ मध्ये डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत या रस्त्याचे खडीकरण करण्याचे ₹१.०० लक्षचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेला विविध योजनेंतर्गत प्राप्त होणा-या निधीमधून कामाची निकड व प्राथम्यक्रमानुसार रस्त्यांची कामे हाती घेतली जातात.

प्रश्नांकित रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमाअंतर्गत उपलब्ध निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मु.आंबडोस (व्हाळवाडी) पो.नांद्रुक (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील नागरभट ते मीरीयेल रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याबाबत**

**(४७) ९२१७२ (२२-०८-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.आंबडोस (व्हाळवाडी) पो.नांद्रुक (ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील ग्रामस्थांनी नागरभट ते मीरीयेल रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याबाबत दिनांक १४ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्याचे काम तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

(३) प्रश्नाधिन ग्रामीण मार्ग क्र. २९७ रस्त्याची एकूण लांबी ९.०० कि.मी. आहे. मात्र प्रत्यक्षात लांबी ७.५०० कि.मी. इतकी आहे. संपूर्ण रस्ता डांबरी पृष्ठभागाचा आहे. सदर लांबीपैकी ०/५०० ते १/९७० व २/८७३ ते ५/५९० कि.मी. चे काम प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मार्च २००८ मध्ये पूर्ण झालेले आहे. कंत्राटदाराने करावयाच्या देखभाल दुरुस्तीचा कालावधी मार्च २०१३ मध्ये पूर्ण झाला आहे.त्यामुळे सन २०१४-१५ मध्ये १३ व्या वित्त आयोग अंतर्गत १.५९३ कि.मी. लांबीचे डांबरी नुतनीकरणाचे रु.१९.९५ लक्षचे काम पूर्ण करण्यात आले असून सदर लांबी सुस्थितीत आहे. उर्वरीत लांबीपैकी १.८०० कि.मी. लांबीचे सन २०१५-१६ मध्ये विशेष दुरुस्तीअंतर्गत रु.१९.९९ लक्षचे डांबरीकरण व नुतनीकरणाचे काम मंजूर असून कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच उर्वरीत ०.७९४ कि.मी. लांबीच्या नुतनीकरणाचे काम सन २०१७-१८ मध्ये प्रस्तावित करण्याचे नियोजन आहे.

उर्वरीत नादुरुस्त लांबीतील रस्त्याच्या दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोफाळी (जि.यवतमाळ) या ग्रामीण भागातील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(४८) ९३८०२ (२२-०८-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोफाळी (जि.यवतमाळ) या ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था झाली असून याबाबत स्थानिकांनी वारंवार संबधित विभागाकडे तक्रार करुनही अद्याप या रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीनुसार या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली असून पोफाळी हे गाव उमरखेड पुसद राज्यमार्ग क्र. २६२ मार्गावर स्थित आहे. पोफाळी या ग्रामीण भागात ठळकपणे एकूण पाच रस्ते अस्तित्वात आहेत. त्यापैकी पोफाळी जनुना इतर जिल्हा मार्ग क्र. १८२ , रामा २६२ ला जोडणारा ग्रामीण मार्ग क्र. २३ व पोफाळी साखर कारखाना ते प्रजिमा ३६ ला जोडणारा ग्रामीण मार्ग क्र. २५ हे तीन रस्ते वाहतुकीस सुस्थितीत आहेत.

रामा २६२ ते कळमुला हातला गगनमाळ इतर जिल्हा मार्ग क्र. १९४ व पोफाळी कुपटी ग्रामीण मार्ग क्र. ३१ या रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम सन २०१६-१७ मध्ये जिल्हा वार्षिक योजना या लेखाशिर्षातर्गत मंजूर असून प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील प्रस्तावित १ ते ३० कामाला निधी देण्याबाबत**

**(४९) ९४१९२ (१९-०८-२०१७). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशान्वये ग्रामविकास विभाग कक्ष अधिकारी यांचे पत्रक क्र. जिप/बांध/ता/प्रआरे/४७६१/२०१७ दि. १९/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये अति मुकाअ जिप अमरावती यांनी १ ते ३० कामे प्रस्तावित त्यांचे पत्र दिनांक १९ जून, २०१७ रोजी ग्रामविकास विभागाला प्राप्त झाले असून त्या प्रस्तावामध्ये सर्व ग्रामीण विभागाशी निगडित कामे असून शासनाने उक्त कामे मंजूर केल्यास ग्रामीण जनतेला फायदा होईल, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या प्रस्तावित १ ते ३० कामाला प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते.

रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमा अंतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी अमरावती जिल्हा परिषदेस रु.८०१.१६ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीमधून तालुका स्तरावर ग्राम विकास विभाग, दि.३ सप्टेंबर, २०१६ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार (PCI) आधारे प्राधान्यक्रम यादया तयार करुन या प्राधान्यक्रम यादीनुसार/गुणांकनानुसार पात्र रस्ते निवडण्याचे व या आधारे रस्त्याचे दुरस्तीचे काम घेण्यात येते.

प्रश्नाधिन १ ते ३० कामांपैकी २ कामांना ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत निधी मंजूर करण्यात आला आहे.

---

**पोलादपूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(५०) ९४२८४ (१९-०८-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलादपूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात गेल्या ५ महिन्यांपूर्वी सर्व ग्रामपंचायतींना भारत दूरसंचार निगम लिमिटेडकडून जोडण्यासाठी रस्त्यालगतच्या साईडपट्टीवर चर खणून ऑप्टीकल फायबर केबल्स टाकण्यात आल्यामुळे संपूर्ण तालुक्यातील तसेच रायगड जिल्हा परिषदेच्या सर्वच रस्त्यांची दुरवस्था झाली असून सदर चरमध्ये पावसाचे पाणी शिरल्यामुळे रूंदावले आहेत तसेच चरावरील मातीच्या थरामुळे रस्त्यावर चिखल झाला असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यांची कामे करण्याची क्षमता रायगड जि.प. कडे नसल्याने सर्वच रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्याची गरज व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदरहू रस्ते दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) या रस्त्यांची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून व्यवस्थापक, भारत संचार निगम लि. रायगड-अलिबाग यांच्याकडे पोलादपूर तालुक्यातील १८ नादुरुस्त रस्ते पुर्ववत करण्यासाठी रु.१२६.२८ लक्ष निधीची मागणी जिल्हा परिषदेने केली आहे. निधी उपलब्ध होताच रस्ता दुरुस्तीची कामे हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.